No. of Printed Pages : 7 **FMT-01**

# BACHELOR'S DEGREE PROGRAMME (BDP)

## Term-End Examination

## December, 2021

### FMT-01 : FOUNDATION COURSE IN MARATHI

*Time : 2 Hours* *Maximum Marks : 50*

**नोट :** सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : 10

(अ) स्वच्छता हाच आरोग्याचा पाया

(ब) कलेचे जीवनात महत्त्व

(क) वृक्षवेलींचे जीवनात स्थान

(ड) 'सदसदविवेकबुद्धी' हाच जीवनाचा दीपस्तंभ





2. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 8

(अ) संत तुकाराम आपली विठ्ठलावरील भक्ति कशी व्यक्त करतात ?

(ब) 'देव दानवा नरे निर्मिले' असे केशवसुत का म्हणतात ?

(क) कोळसेवाल्याचे रेखाचित्र म्हणजे यंत्रयुगातले नवनत्य आहे असे मर्ढेकरांना का वाटते ?

(ड) कातरवेळ आल्यावर आक्काची मन:स्थिती व्याकुळ का झाली ?

3. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(अ) 'वळीव' या कथेत तांब्याच्या अंगठीचे कोणते महत्त्व तात्याच्या दृष्टीने सांगितले आहे ?

(ब) चेलम्याचे पाणी प्रह्लादने प्यायल्यामुळे ते बैलांनाही चालले नाही. यातून समाजाची अस्पृश्यतेबद्दलची कोणती दृष्टी दिसून येते ?

(क) आकाशाशी नाते जोडल्यावर कोणना अनभव येत असल्याचे शिखाडकर सांगतात ?

(ड) मग्लीमायला आपणच कंजाला मारले अशी अपराधी भावना का होते ?

4. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीपा लिहा : 6

(अ) 'गंडयाभाऊचे दखणे' या कथेतील डॉक्टरांची ठकबाजी

(ब) अक्षर वाङ्मयाची वैशिष्टये

(क) बालगंधर्वांचे रंगभमीवरील दर्शन

(ड) भाऊरावांच्या मते शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन

5. बहव्रीहि समास म्हणजे काय ते सांगन त्याची **दोन** उदाहरणांच विग्रह करून दाखवा. 5





**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा समारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(अ) ऐकावे जनाचे करावे मनाचे

(ब) जगी सर्व सखी असा कोण आहे ?

(क) जगाच्या कल्याणा संतांच्या विभती

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाकप्रचारांचा अर्थ सांगा : 3

(अ) काळीज उलटे असणे

(ब) डोळे कायमचे मिटणे

(क) हस्तक्षेप करणे

(ड) तिलांजली देणे

(इ) हबकाच बसणे.

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(अ) चोराच्या मनात चांदणं

(ब) बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर

(क) अगं अगं म्हशी. मला कठं नेशी ?

(ड) खर्चणाराचे खर्चते आणि कोठावळ्याचे पोट दखते.

(इ) यान सांगावा जना भाणि अपमान सांगावा मना.

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : 4

(अ) पर्यावरणाचा प्रश्न हा मानवसापेक्ष कसा आहे ?

(ब) स्त्री–मक्ति चळवळीची गरज का आहे ?

(क) लोकसंख्यावाढीचे कोणते भीषण परिणाम भविष्यात मानवजातीला भोगावे लागतील ?

(ड) लोकशाहीत न्यायसंस्थेचे महत्त्व कोणते ?





8. खाली उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

In New York Bhimrao Ambedkar experienced a scintillating new openness. With untouchability meaning little to Americans and Indians there, he discovered the joys of student companionship. For a while he enjoyed himself. He spent his days seeing drams, playing games like badminton and learning new sports such as ice-skating. Finally, with a new sense of responsibility, he turned to his studies. It was under the guidance of Professor Edward Seligman, an economist, that he was awarded his M. A. in 1915 and submitted his dissertation for his Ph. D. in 1916.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

जोपर्यंत माणस जात. धार्म. वंश इत्यादि गोष्टींचे उपरे आणि तकलाद ओझे फेकन देत नाही. जोपर्यंत माणस प्रेम. सौहार्द्र. दया इत्यादि माणसांच्या उपजत गणांच्या अंगाने चालत नाही. तापेर्यंत त्याची प्रगति होऊ शकणार

नाही. वास्तविक धर्माचा आधार माणसाला जीवनाच्या वाटेवर अनेकदा हवासा वाटतो. परमेश्वर पाठीशी आहे ह्या कल्पनेने त्याचे मनोधैर्य वाढते. द:खांचा सामना करण्यासाठी त्याला बळ मिळते. हा धर्म परमेश्वरावरील श्रद्धा. त्याच्यावरील विश्वास अशा स्वरूपाचा असेल तर तो माणसाला आत्मिक आनंद देणारा असतो. पण तो जर कर्मकांडांच्या अवडंबरांनी ग्रासलेला असेल तर तो माणसाला चकीच्या मार्गावर भरकटत नेतो. याकरिता धर्माचे स्वरूप व्यापक पातळीवर नेण्याची अत्यंत गरज आहे. माणसाच्या आचारविचारात जर विवेक असेल लर धर्माक्ता योग्य दिशा मिळ शकते.